

मुकुल माधव फाउंडेशनतर्फे शिरवळ, उंब्रज, कोकरुड आणि पाली येथील चार जिल्हा परिषद शाळांमध्ये वैद्यकीय शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी सातारा जिल्ह्यातील शंभरहून अधिक शारीरिक व मानसिकदृष्ट्या अपंग मुलांना फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया, बायसिकल एंजलचे संस्थापक राकेश बक्षी, प्रसिद्ध इएनटी सर्जन राम धिल्लाँ यांच्या हस्ते विशेष खुर्च्यांचे वाटप करण्यात आले.